# मराठी पत्रकार दिन

# ऑनलाईन व्याख्यान

# 6 जानेवारी २०२२



# पत्रकारिता से सामाजिक परिवर्तन : भानावत

**भास्कर संवाददाता** | नागपुर

बाबूराव पराडकर और बालशास्त्री जांभेकर जैसे मराठी पत्रकारों ने पत्रकारिता में इतिहास रचा। पत्रकारिता से सामाजिक परिवर्तन की प्रक्रिया शुरू होती है। मीडिया इस बदलाव को तेजी से स्वीकार कर रहा है। डिजिटल मीडिया के माध्यम से समाचार प्रकाश की गति से लोगों तक पहुंच रहा है। अब सिर्फ सूचना देना ही पत्रकारिता नहीं है, बल्कि पत्रकारिता क्रांतिकारी होनी चाहिए। यह विचार राजस्थान विश्वविद्यालय के जनसंचार केंद्र के पूर्व प्रमुख प्रा. डॉ. संजीव भानावत ने व्यक्त किया। वे मराठी पत्रकार दिन के अवसर पर 'पत्रकारिता में नए आयाम' विषय पर आयोजित ऑनलाइन व्याख्यान में बोल रहे थे।

राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज विश्वविद्यालय, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विवि जलगांव, पुण्यश्लोक अहिल्याबाई होलकर सोलापुर विवि सोलापुर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाड़ा विवि औरंगाबाद, सावित्रीबाई फुले विवि पुणे, शिवाजी विद्यापीठ कोल्हापुर आदि विश्वविद्यालयों के पत्रकारिता विभाग के संयुक्त तत्वावधान में व्याख्यान का आयोजन किया गया। अध्यक्षता कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विवि जलगांव के प्र-कुलगुरु डॉ. बी.वी. पवार ने की। कार्यक्रम में रातुम विवि के जनसंवाद और पत्रकारिता विभाग प्रमुख डॉ. मोईज हक, डॉ. सुधीर भटकर, डॉ. रवींद्र चिंचोलकर, डॉ. उज्ज्वला बर्वे, डॉ दिनकर माने उपस्थित थे।

**दैनिक भास्कर दि. ७-०१-२०२२**

महाराष्ट्र टाइम्स नागपूर । शुक्रवार, ७ जानेवारी २०२२

# माहिती पोहचविण्यापुरती पत्रकारिता नको

## डॉ. भानावत यांचे प्रतिपादन; विद्यापीठांचे संयुक्त आयोजन

म.टा. प्रतिनिधी, नागपूर

'वृत्तपत्रे व इतर सर्वच माध्यमे वेगाने बदलत आहेत. डिजिटल माध्यमांतून प्रकाशाच्या गतीने बातम्या लोकांपर्यंत पोहोचत आहेत. असे असले तरी फक्त माहिती पोहोचविण्यापुरती पत्रकारिता करून चालणार नाही', असे प्रतिपादन राजस्थान विद्यापीठाच्या जनसंचार केंद्राचे माजी प्रमुख प्रा. डॉ. संजीव भानावत यांनी गुरुवारी केले.

मराठी पत्रकार दिनानिमित्त 'पत्रकारितेतील नवे आयाम' विषयावर आयोजित ऑनलाइन व्याख्यानात ते बोलत होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठातील



ऑनलाइन व्याख्यानात सहभागी डॉ. सुधीर भाटकर, डॉ. उज्ज्वला बर्वे, डॉ. मोईझ मन्नान हक व प्रा. डॉ. संजीव भानावत.

पत्रकारिता विभागांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्याते म्हणून राज्यपालांचे जनसंपर्क अधिकारी उमेश काशीकर, पत्रकार राजेंद्र हुंजे उपस्थित होते; तर अध्यक्षस्थानी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावचे प्र-कुलगुरू डॉ. बी. व्ही. पवार होते.

प्र-कुलगुरू डॉ. पवार म्हणाले, 'माध्यमांचे स्वरूप बदलले असले, तरी पत्रकारितेवरील विश्वास तसाच दृढ आहे.' उमेश काशीकर म्हणाले, 'माध्यमांसोबतच जनसंपर्क क्षेत्रातही करिअरच्या खूप संधी निर्माण होत आहेत. मी एकाच माध्यमात काम करणार, हा दुराग्रह बाळगू नये.' राजेंद्र हुंजे म्हणाले, 'पत्रकारितेच्या अभ्यासक्रमात काळानुरूप बदल करण्याची गरज असून कौशल्ययुक्त पत्रकारिता ही सध्याच्या काळाची गरज आहे.' प्रास्ताविक डॉ. निशा पवार यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. तेजस्विनी कांबळे यांनी केले. आभार डॉ. विनोद निताळे यांनी मानले. यावेळी सहभागी विद्यापीठांतील जनसंवाद आणि पत्रकारिता विभागाचे प्रमुख डॉ. मोईझ मन्नान हक, डॉ. सुधीर भटकर (जळगाव), डॉ. रवींद्र चिंचोलकर (सोलापूर), डॉ. निशा पवार (कोल्हापूर), डॉ. उज्ज्वला बर्वे (पुणे), डॉ. दिनकर माने (औरंगाबाद) यांची उपस्थिती होती.

### मराठीला क्रांतिकारी वारसा

देशाच्या बहुभाषिक पत्रकारितेत मराठी पत्रकारितेला क्रांतिकारी वारसा आहे. बाबुराव पराडकर, बाळशास्त्री जांभेकर यांच्यासारख्या मराठी पत्रकारांनी पत्रकारितेत इतिहास निर्माण केला. पत्रकारिता हे व्रत असून त्याद्वारे समाजबदलाची प्रक्रिया घडून येते, असे डॉ. संजीव भानावत म्हणाले.

**दैनिक महाराष्ट्र टाइम्स दि. ०७-०१-२०२२**

## प्रा. डॉ. संजीव भानावत यांचे प्रतिपादन; 'पत्रकारितेतील नवे आयाम' या विषयावर सहा विद्यापीठांतर्फे ऑनलाईन व्याख्यान

# मराठी पत्रकारितेला क्रांतिकारी वारसा लाभला

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** देशाच्या बहुभाषिक पत्रकारितेत मराठी पत्रकारितेला क्रांतिकारी वारसा आहे. बाबुराव पराडकर, बाळशास्त्री जांभेकर यांच्यासाख्या मराठी पत्रकारांनी पत्रकारितेत इतिहास निर्माण केला. पत्रकारिता हे व्रत असून त्याद्वारे समाजबदलाची प्रक्रिया घडून येते. ही प्रक्रिया ताकदीने घडण्यासाठी नव्याने या क्षेत्रात येणाऱ्या पत्रकारांनी बहुविध माध्यम कौशल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन राजस्थान विद्यापीठाच्या जनसंचार केंद्राचे माजी प्रमुख प्रा. डॉ. संजीव भानावत यांनी केले.

मराठी पत्रकार दिनानिमित्त 'पत्रकारितेतील नवे आयाम' या विषयावर आयोजित ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, या



विद्यापीठातील पत्रकारिता विभागांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याकार्यक्रमासाठी डॉ. भानावत यांच्यासह व्याख्याते म्हणून महाराष्ट्राच्या राज्यपालांचे जनसंपर्क अधिकारी उमेश काशीकर, पत्रकार राजेंद्र हुंजे हे उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावचे प्र-कुलगुरू डॉ. बी.व्ही. पवार होते. यावेळी सहभागी विद्यापीठातील जनसंवाद आणि पत्रकारिता विभागाचे प्रमुख डॉ. मोईज मन्नान हक, डॉ. सुधीर भटकर, डॉ. रवींद्र चिंचोलकर आदी उपस्थित होते.

प्रा. डॉ. संजीव भानावत पुढे म्हणाले की, बदल स्वीकारणे निसर्गनियमाला धरून असते. वृत्तपत्रे व इतर सर्वच माध्यमे हा बदल वेगाने स्वीकारत आहेत. डिजिटल माध्यमांतून प्रकाशाच्या गतीने बातम्या लोकांपर्यंत पोहोचत आहेत. असे असले तरी फक्त माहिती पोहोचवण्यापुरती पत्रकारिता करून चालणार नाही. क्रांतिकारी पत्रकारितेचा वारसा जोपासायला हवा असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ. बी.व्ही. पवार म्हणाले की, माध्यमांचे स्वरूप बदलले असले तरी पत्रकारितेवरील विश्वास तसाच दृढ आहे. जनमत निर्माण करणारी पत्रकारिता करावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले. आभार डॉ. विनोद निताळे यांनी मानले. डॉ.गोपी सोरडे, डॉ.सोमनाथ वडनेरे यांचे तांत्रिक सहकार्य लाभले.

लोकसत्ता Fri, 07 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65446405

**दैनिक लोकसत्ता दि. ०७-०१-२०२२**

# मराठी पत्रकारितेला क्रांतिकारी वारसा : प्रा. डॉ. संजीव भानावत

## 'पत्रकारितेतील नवे आयाम' वर सहा विद्यापीठांतर्फे ऑनलाईन व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ६ जानेवारी**

देशाच्या बहुभाषिक पत्रकारितेत मराठी पत्रकारितेला क्रांतिकारी वारसा आहे. बाबूराव पराडकर, बाळशास्त्री जांभेकर यांच्यासारख्या मराठी पत्रकारांनी पत्रकारितेत इतिहास निर्माण केला. पत्रकारिता हे व्रत असून त्याद्वारे समाजबदलाची प्रक्रिया घडून येते. ही प्रक्रिया ताकदीने घडण्यासाठी नव्याने या क्षेत्रात येणाऱ्या पत्रकारांनी बहुविध माध्यम कौशल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन राजस्थान जयपूर विद्यापीठाच्या जनसंचार केंद्राचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. संजीव भानावत यांनी केले.

मराठी पत्रकार दिनानिमित्त पत्रकारितेतील नवे आयाम या विषयावर आयोजित ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या विद्यापीठातील






पत्रकारिता विभागांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याकार्यक्रमासाठी डॉ. भानावत यांच्यासह व्याख्याते म्हणून महाराष्ट्राच्या राज्यपालांचे जनसंपर्क अधिकारी उमेश काशीकर, साम टी.व्ही.चे सहसंपादक राजेंद्र हुंजे हे उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावचे प्र-कुलगुरू डॉ. बी.व्ही. पवार होते.

यावेळी सहभागी विद्यापीठातील जनसंवाद आणि पत्रकारिता विभागाचे प्रमुख डॉ. सुधीर भटकर (जळगाव), डॉ. रवींद्र चिंचोलकर (सोलापूर), डॉ. निशा पवार (कोल्हापूर), डॉ. उज्वला बर्वे (पुणे), डॉ. मोईज हक (नागपूर), डॉ. दिनकर माने (औरंगाबाद) उपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगतात क.ब.चौ.उ.म.विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. बी.व्ही. पवार म्हणाले की, पत्रकारितेचे विश्व विस्तारत आहे. मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या पुढे जाऊन डिजिटल माध्यमांद्वारे गतिमान पत्रकारिता केली जात आहे. माध्यमांचे स्वरूप बदलले असले तरी पत्रकारितेवरील विश्वास तसाच दृढ आहे. नव्याने पत्रकारितेत येणाऱ्या पत्रकारांनी नव्या जगाची पत्रकारिता करावी. लोकांची माहितीची गरज ओळखावी. जनमत निर्माण करणारी पत्रकारिता करावी असे आवाहन त्यांनी केले.

उमेश काशीकर म्हणाले की, जनसंपर्क हा विषय खूप व्यापक आहे. जनसंपर्कातून समाजासोबत संवादाचा सेतू बांधला जातो. जनसंपर्क म्हणजे दिखावा नव्हे. जनसंपर्क ही दुहेरी संज्ञापन प्रक्रिया आहे. शासकीय संस्था, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, कंपन्या यांनी आपला संवाद अधिक दृढ करण्यासाठी जनसंपर्क केलाच पाहिजे. माध्यमक्रांती ही जनसंपर्कासाठी मोठी पर्वणी आहे. जनसंपर्काची साधने आधुनिक बदलली आहेत. आज सर्वच प्रसारमाध्यमे विविध उपक्रमातून जनसंपर्क करीत आहेत. ती काळाची गरज आहे.

राजेंद्र हुंजे यांनी पत्रकारितेच्या अभ्यासक्रमात काळानुरूप बदल करण्याची गरज आहे. दूरचित्रवाणी पत्रकारितेत आशय व सादरीकरणाला खूप महत्त्व आहे. कौशल्ययुक्त पत्रकारिता ही सध्याच्या काळाची गरज आहे. पत्रकारिता ही सतत नवे शोधण्यात पुढे गेली पाहिजे. परिस्थितीकडे साकल्याने जेव्हा बघू तेव्हाच आपण नवे काही करू शकू. पत्रकारिता ही कमी शब्दात अधिक आशय व्यक्त करणारी, चिंतन करायला लावणारी हवी असेही शेवटी त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले. डॉ.सोमनाथ वडनेरे, डॉ. भास्कर भोसले (औरंगाबाद) अर्पण पठाणे (नागपूर) निशिगंधा क्षीरसागर (पुणे) यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन प्रा. तेजस्विनी कांबळे यांनी केले. आभार डॉ. विनोद निताळे यांनी मानले. डॉ.गोपी सोरडे, डॉ.सोमनाथ वडनेरे यांचे तांत्रिक सहकार्य लाभले.

**दैनिक तरुण भारत दि. ०७-०१-२०२२**

विचारमंथन • 'पत्रकारितेतील नवे आयाम' या विषयावर ऑनलाइन व्याख्यान

# पत्रकारांनी बहुविध माध्यम कौशल्ये आत्मसात करावीत : प्रा. डॉ. भानावत

प्रतिनिधी | सोलापूर

बहुभाषिक पत्रकारितेत मराठी पत्रकारितेला क्रांतिकारी वारसा आहे. बाबूराव पराडकर, बाळशास्त्री जांभेकर यांच्यासारख्या मराठी पत्रकारांनी पत्रकारितेत इतिहास निर्माण केला. पत्रकारिता हे व्रत असून त्याद्वारे समाजबदलाची प्रक्रिया घडून येते. ही प्रक्रिया ताकदीने घडण्यासाठी नव्याने या क्षेत्रात येणाऱ्या पत्रकारांनी बहुविध माध्यम कौशल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन राजस्थान जयपूर विद्यापीठाच्या जनसंचार केंद्राचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. संजीव भानावत यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या विद्यापीठातील पत्रकारिता विभागांच्या संयुक्त विद्यमाने मराठी पत्रकार दिनानिमित्त 'पत्रकारितेतील नवे आयाम' या विषयावर आयोजित ऑनलाइन व्याख्यान आयोजिले होते. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावचे प्र-कुलगुरू डॉ. बी.व्ही. पवार होते.



प्रा. डॉ. भानावत

यावेळी डॉ. सुधीर भटकर (विभाग प्रमुख, जळगाव), डॉ. रवींद्र चिंचोलकर (विभाग प्रमुख,सोलापूर), डॉ. निशा पवार (विभाग प्रमुख,कोल्हापूर), डॉ. उज्ज्वला बर्वे (विभाग प्रमुख, पुणे), डॉ. मोईज हक (विभाग प्रमुख,नागपूर), डॉ. दिनकर माने (विभाग प्रमुख, औरंगाबाद) उपस्थित होते.

## डिजिटल माध्यमांद्वारे गतिमान पत्रकारिता

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावचे प्र-कुलगुरू डॉ. बी.व्ही. पवार म्हणाले की, पत्रकारितेचे विश्व विस्तारत आहे. मुद्रित, इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या पुढे जाऊन डिजिटल माध्यमांद्वारे गतिमान पत्रकारिता केली जात आहे. माध्यमांचे स्वरूप बदलले असले तरी पत्रकारितेवरील विश्वास तसाच दृढ आहे.

राज्यपालांचे जनसंपर्क अधिकारी उमेश काशीकर म्हणाले की, जनसंपर्क हा विषय खूप व्यापक आहे. शासकीय संस्था, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, कंपन्या यांनी आपला संवाद अधिक दृढ करण्यासाठी जनसंपर्क केलाच पाहिजे. माध्यमांसोबतच जनसंपर्क क्षेत्रातही करिअरच्या खूप संधी निर्माण होत आहेत.

साम टीव्हीचे राजेंद्र हुंजे यांनीही मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले. निशिगंधा क्षीरसागर यांनी परिचय करून दिला. प्रा. तेजस्विनी कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विनोद निताळे यांनी आभार मानले. डॉ.विनोद निताळे, डॉ. गोपी सोरडे, डॉ.सोमनाथ वडनेरे यांचे तांत्रिक सहकार्य लाभले.